ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 8 | APRIL - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# सोलापूर जिल्ह्यातील मांग समाजातील स्त्रियांचे जीवन



**प्रा. गायकवाड बाळू भिमराव**
**इतिहास विभाग, कर्मवीर भाऊराव पाटील , महाविद्यालय,पंढरपूर (स्वायत्त )**

## प्रस्तावना-

प्राचीन काळापासून मांगाकडे शुभ शकुन म्हणून पाहिल्यामुळेच मांग पुरुषाकडे पाहण्याचा जो दृष्टिकोन होता. त्यापेक्षाही अधिक मांगल्यपूर्ण पद्धतीने मांग स्त्रीकडे पाहिले जात असे त्यामुळे शुभकार्यासाठी जाताना मातंगणीचे दर्शन होणे किंवा मांगणीने पाण्याने भरलेला कलश घेऊन आडवे जाणे. सोलापूर जिल्ह्यातील मांग स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण खूपच कमी असलेली दिसून येते. ग्रामीण भागातील स्त्रिया या शेतामध्ये शेतमजुरी करणाऱ्या, साखर कारखान्यात इतर कारखान्यात काम करत असलेली दिसून येतात.मांग पुरुष पत्ते खेळत असलेले, झोपलेले ,दारू पीत असलेले दिसून आले. परंतु त्यांच्या कुटुंबातील स्त्रिया मात्र काम करत असलेले दिसून आल्या.

## मांग समाजातील स्त्रियांची कौटुंबिक स्थिति

सोलापूर जिल्ह्यातील मांग समाजातील स्त्रियांचे जीवन यांचा अभ्यास करत असताना शहरी व ग्रामीण या दोन्ही भागातील स्त्रियंचा अभ्यास केलेला आहे. तसेच विभक्त व एकत्र कुटुंबाचा अभ्यास केलेला आहे .शहरी भागातील सुशिक्षित स्त्रिया मांग स्त्रिया अशिक्षित या झोपडपट्टीतच राहत असलेली दिसून येते. या स्त्रिया नेहमी पाणी, वीज यासारख्या दैनंदिन गरजेच्या बाबतीत संघर्ष करत असलेली दिसून येते . सोलापूर जिल्ह्यातील मांग स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण खूपच कमी असलेली दिसून येते. ग्रामीण भागातील स्त्रिया या शेतामध्ये शेतमजुरी करणाऱ्या, साखर कारखान्यात इतर कारखान्यात काम करत असलेली दिसून येतात.मांग पुरुष पत्ते खेळत असलेले , झोपलेले ,दारू पीत असलेले दिसून आले. परंतु त्यांच्या कुटुंबातील स्त्रिया मात्र काम करत असलेले दिसून आल्या. स्त्रियांना कोणत्याच प्रकारच्या निर्णय प्रक्रियेत सामील करून घेत नसल्याची दिसून आले.[१]

## मांग समाजातील स्त्रियांचेराजकीय स्थान -

मांग समाजातील स्त्रियांना राजकीय आरक्षणाबाबतीत माहिती नसलेली दिसून आले. पुरुषांना मात्र या गोष्टी माहीत असूनही त्यांनी त्यांना यापासून वंचित ठेवली चे लक्षात आले. कोणत्याही समाजातील सांस्कृतिक परंपरा समाज यांचा परिणाम त्या समाजातील स्त्रियांच्याविषयावर होत असलेली दिसून . त्यामुळे त्यांच्या प्रथा, परंपरा, रूढी, चालीरीती, सामाजिक चालीरीती समजून घेणे आवश्यक असते. हिंदू धर्मातील आणि जातीमध्ये स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान असलेली दिसून येते. पण मांग स्त्रिया याला अपवाद आहेत.[२]

## मांग समाजातील स्त्रियांचेसामाजिक कार्य-

प्राचीन काळापासून मांगाकडे शुभ शकुन म्हणून पाहिल्यामुळेच मांग पुरुषाकडे पाहण्याचा जो दृष्टिकोन होता. त्यापेक्षाही अधिक मांगल्यपूर्ण पद्धतीने मांग स्त्रीकडे पाहिले जात असे त्यामुळे शुभकार्यासाठी जाताना मातंगणीचे दर्शन होणे किंवा मांगणीने पाण्याने भरलेला कलश घेऊन आडवे जाणे. एखाद्या वाडयाचे, किल्ल्याचे काम पूर्ण होत नसले तर मातंगणीला त्यातल्या त्यात गरोदर मातेला जिवंतपणे गाढले जात. अशी उदाहरणे समाजात सापडतात. उदाहरणार्थ कुरुलची केचुबाई. मांगणीचे जीवन उध्वस्त झाले. त्यातूनच देवदासी, तमाशात, नाचणारी स्त्री, मुरळी, अंबाबाईचे भक्त अशी हलक्या दर्जाची भूमिका मांग स्त्रीयानाला करावी लागली. मांग स्त्रिया या शिक्षणामध्ये प्रगती करू शकलेला नाहीत. त्यांना कौटुंबिक अडचणीमुळे शिक्षण घेता आले नाही. शिक्षणाबाबत या प्रगती करू शकलेले नाहीत. कोणतेही क्षेत्रात मातंगीं पुढे आले नाही. मांग स्त्रिया या बहुतांश गाव गाड्यांमध्ये मांगवाड्यातच राहत असल्याची दिसून आले .त्यांची घरी म्हणजे कच्चे भिंतीची किंवा झोपडी त्यांची घरे म्हणजे छोट्या एका किंवा दोन खोल्या शहरी भागामध्ये काही ठिकाणी मागासवर्गीय योजनेतून काही घरे बांधून दिलेली पाहावयास मिळतात. घरामध्ये स्वतंत्र स्नान घर असल्याचे खूपच कमी प्रमाणात पहावयास मिळाले. ज्या घरात त्यांचा संसार चालतो तिथेच त्यांना

आंघोळ करावी लागते. नाहीतर घराच्या बाहेर एका कोपऱ्यावर अडुसा करून बांधलेली कापडी स्नानगरात तयार केली जाते. यामध्येच खूप कमी प्रमाणात गटाराची व्यवस्था चांगली असली असे पहावयास मिळेल. घरासमोर वाहणाऱ्या घाण पाण्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याची दिसून येते. सोलापूर जिल्ह्यातील मांग समाजातील पन्नास वर्षे पुढील पुरुष कोणत्याही प्रकारचे काम करत नसल्यामुळे घर चालवण्याचीसर्व जबाबदारी ही मांग स्त्रिया वरती पडते .दारद रेषेखाली लोकांना स्वस्त दरात गहू ,तांदूळ ,रॉकेल देण्याची योजना केली आहे .पण मांग समाजातील बहुतांशी लोकांकडे दारिद्र रेषेखाली रेशन कार्ड नाही .मांग स्त्रियांशी चर्चा करताना अशी लक्षात आली की अशा प्रकारचे कार्ड तयार करून देण्यासाठी स्थानिक लोक कडून मोठ्या प्रमाणात पैशाची मागणी केली जाते. विविध सरकारी योजनेमध्ये मांग लोकांची नावे टाकण्यासाठी मोठ्या प्रमाणात पैशाची मागणी केली जाते .हे लोक अशिक्षित असल्यामुळे ते कुठेही दादमागू शकत नाहीत. मांग समाजाला नेहमीच उच्चवर्णीय लोकांकडून लेखले जाते. पुरुष व्यसनाधीन, दिवसभर पत्ते खेळण्यांमध्ये दंग परिणामी मांग स्त्रियांना मोल मजुरी करून प्रपंच चालवावा लागतो.[३]

## मांग समाजातील स्त्रियांचे धार्मिक कार्य-

मांग स्त्रिया अजूनही मोठ्या प्रमाणावर ती हिंदूचे सण साजरे करतात. काही स्त्रिया या निरंकारी बाबासारख्या विविध बाबाचे अनुयायी बनलेले आहेत. हे बाबा लोक त्यांच्या जीवनात नवी दिशा देत आहेत असे ते मानतात. त्याच पद्धतीने समर्थांच्या बैठकीला सुद्धा मांग समाजातील स्त्रिया मोठ्या प्रमाणावर ती जात आहेत .ते एकमेकीस भेटल्यानंतर जय सद्गुरु असे उद्घोष करतात. याचबरोबर मांग स्त्रिया मरीआई व लक्ष्मी यांची पूजा करताना दिसून येतात . मांग लोकवस्तीत एका दगडाला शेंदूर लावून पूजा करताना मांग स्त्रिया दिसतात. मरीआईला कोंबडे, बोकडांचे बळी या मांग स्त्रिया कडून दिले जातात. आषाढ महिन्यात प्रत्येक गावामध्ये मरिआईचा उस्तव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. यावेळी काही मांग स्त्रिया हातात कडूलिंबाचा ढाहळा घेऊन नाचत असतात आणि त्यांच्या अंगात मरीआई आलेली असते याचा अर्थ विज्ञान युगातही अंधश्रद्धेपोटी मांग स्त्रिया अश्मयुगीन युगात असल्यासारखे वावरताना दिसतात. मांग स्त्रियांमध्ये मरीआई व इतर देव देवतांच्या नावाने मंगळवार, शुक्रवारी या दिवशी उपवास करण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. श्रावण महिन्यात मांसाहार न करणे .सत्यनारायण घालणे ,उपवास करणे या प्रथा मांग स्त्री या पाळतात. सकाळी उठल्यावर तुळसआणि सूर्याची उपासना करताना मांग स्रीया आढळून येतात. अजूनही हिंदू धर्माचा परिणाम या मांग स्त्रिया वरती टिकून आहे हेच यातून लक्षात येते.[४]

हिंदूधर्मीय लोकांमध्ये आजही मांग स्त्रियांना मानाचे स्थान आहे. लग्न, बारशे वेगवेगळया शुभ कार्यामध्ये मांग स्त्रियांनामानपन दिले जाते. मांग स्त्रियांच्या हातून शुभकार्याची सुरुवात केली जाते. मांग स्त्रिया या शुभ मानल्या जातात. हिंदूलोक समजतात की मांगस्त्री लक्ष्मीचे प्रतीक आहेत. काही हिंदूलोक आजही मांग स्त्रियांच्या पाया पडतात .मांग स्त्रिया पोतराज सोबत असतात. मांगलोकांमध्ये पोतराज संख्या जास्त आहे. आज ही मांग स्त्रिया हातावर मोठ्या प्रमाणावर गोंदून घेतलेली दिसते हे रेणुका मातेची निशाणं आहेत असे समजतात.

हिंदू धर्मशास्त्रानुसार जन्मापासून ते मरेपर्यंत सोळा संस्कारांना खूप महत्त्व दिले जाते. त्याच पद्धतीने मांग जातीमध्ये पाचवीची पूजा केली जाते. मांग स्त्रियांच्या गर्भधारणेच्या पाचव्या महिन्यात ते केले जाते. मांग स्त्रियांच्या माहेरच्या लोकांकडून ही प्रथा पार पाडलीजाते. गरोदर मांग स्त्रीला हिरव्या रंगाची साडी नेसवतात .हिरव्या बांगड्या आणि पांढरे फुले घातली जातात. गरोदर स्त्री ची आई पाच प्रकारची फळांनी मुलीची ओटी भरत असते. याला ओटी भरणे, डोहाळे किंवा गर्भधारणा असे म्हणतात .सहसा श्रीमंत मांग घरामध्ये ही प्रथा पार पाडली जाते. पण गरीब कुटुंबामध्ये उसनवारी करून कर्ज काढून ही प्रथा पार पाडताना दिसून येते .[५]

## मांग समाजातील स्त्रियांचे दायाचे कार्य -

ग्रामीण भागामध्ये आज ही मांग स्त्रिया दायाचे काम करताना दिसतात. त्या उत्कृष्टपणे दाई चे काम करतात. हे काम एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वंशपरंपरेने चालत आलेले आहे. मांग स्त्रिया अजूनही घरातील पुरुषांच्या संमतीशिवाय कोणतेही निर्णयघेऊ शकत नाहीत. साधे कुटुंब नियोजन करायचे असेल. दवाखान्यात जावयाचे असेल तरी त्यांना पुरुषाच्या परवानशिवाय निर्णय घेता येत नाहीत. मांग स्त्री देव भोळे देववादी बनली.तिला आधुनिक सुधारणा समजल्या नाहीत. त्यामुळे स्त्री शिकली नाही. म्हणून कुटुंबाला योग्य दिशा मिळाली नाही.[६]

## मांग समाजातील स्त्रियांची आर्थिक स्थिति-

मांग समाजाच्या स्त्रियांना रस्त्याच्या कडेल्या असणाऱ्या लिंबाच्या झाडांच्या निंबोळया वेचने,दोर तयार करणे, फिरकी फिरवणे ,मटण विकणे, भिक्षा मागणे, भंगार गोळा करणे, खुरपणी करणे ,सफाई करणे, धुनी भांडी करणे ,भाजीपाला विकणे ,खेड्यात पाटलाच्या घरी धान्य निवडणे, झाडलोट करणे अशी वैयक्तिक पातळीवर कामे करावी लागतात. तर पतीला वीटभट्टी वरील काम, ऊसतोड कामगार, खाणीमध्ये काम, लाकूडतोड करणे , गवत विकणे अशी कामे करावी लागतात.[७]

## मांग समाजातील स्त्रियांची अंधश्रद्धा

या मांग स्त्रीला अंधश्रद्धाचे विळखा न पडाला तर नवलच गरीबी, अज्ञान, अंधकार ,निकृष्ट राहणीमान जगण्यातील इच्छा अपुरी राहणे यामुळे हातबल झालेली मांग स्त्री देवदेवतांवर हवाला ठेवून आहे. मग जवळपास असलेल्या देवाला नवस बोलणे, अंगात येणे ,परडी हाती घेणे, जोगवा मागणे, मुलींना देवदासी सोडणे, मुरळी सोडणे, मरीईचा पोतराज ,.खंडोबाचा वाघ्या देवाला सोडणे यामध्ये स्त्रियांचा मोठा वाटा असतो.या अंधश्रद्धेतून समाजाची खूप मोठी अदोगती झालेली आहे. अशा प्रकारे अंधश्रद्धेतून देवाला सोडलेला मुरळया,. देवदासी या जोगवा मागत नाचून समाजाचे मनोरंजन करायला लागल्या काही स्त्रिया तमाशात गाणे करून उदरनिर्वाह करू लागल्या.[८]

**मांग समाजातील स्त्रियांची शैक्षणिक स्थिति-**

संपूर्ण समाज एक शैक्षणिक दृष्ट्या राहीला परिणामी भारताच्या आधुनिक ,औद्योगिक ,शैक्षणिक, सामाजिक प्रगतीत मातंग समाज मागे राहिला.बहुसंख्य मांग समाजाच्या मुली शिक्षणापासून वंचित आहेत. एकंदर उपेशीत असणाऱ्या मांग समाजाची स्त्री देखील खूपच उपेक्षित राहिली आहे. पती व्यसनाधीन असेल तर त्या स्त्रीच्या वाटेला खूप मोठी दैनिय अवस्था येते. मांग समाजात बहुतांश पुरुष दारू, जुगार, मटका ,गुटखा अशा व्यसनाने गुरुपटलेला असल्याने अनु दारूच्या निशेत पत्नीला मारहाण करतो.या भीतीने कष्टातून संसार चालवत आपल्या पतीच्या दारूची उधारी भागवणारी हातबल मातंग स्री सर्वत्र दिसते. चावडीत किंवा तक्क्यात दिवसभर जुगाड खेळून संध्याकाळी उधार दारू पिऊन बिड्या फुंकणारी मांगपुरुष आपल्या पत्नीला घर संसार चालवताना किती त्रास असतील आणि यामुळे त्या स्त्रीची किती मुस्कटदाबी होते याचा विचार करत नाहीत.सोलापूर जिल्ह्यातील स्री हि कष्टाळू आहे तर पुरुष कष्ट टाळू आहेत.[९]

**समारोप -**

हिंदूधर्मीय लोकांमध्ये आजही मांग स्त्रियांना मानाचे स्थान आहे. लग्न, बारशे वेगवेगळया शुभ कार्यामध्ये मांग स्त्रियांना मानपन दिले जाते. मांग स्त्रियांच्या हातून शुभकार्याची सुरुवात केली जाते. या मांग स्त्रीला अंधश्रद्धाचे विळखा न पडाला तर नवलच गरीबी, अज्ञान, अंधकार ,निकृष्ट राहणीमान जगण्यातील इच्छा अपुरी राहणे यामुळे हातबल झालेली मांग स्री देवदेवतांवर हवाला ठेवून आहे. मांग स्त्रिया अजूनही मोठ्या प्रमाणावर ती हिंदूचे सण साजरे करतात. विज्ञान युगातही अंधश्रद्धेपोटी मांग स्त्रिया अश्मयुगीन युगात असल्यासारखे वावरताना दिसतात. मांग समाजातील स्त्रियांना राजकीय आरक्षणाबाबतीत माहिती नसलेली दिसून आले.

**संदर्भ ग्रंथ-**

१) मुलाखत व प्रश्नावलीच्या आधारे
२) मुलाखत व प्रश्नावलीच्या आधारे
३) मुलाखत व प्रश्नावलीच्या आधारे
४) ढेरे रा.ची. मराठी लोकसंस्कृतीचे उपासक, ज्ञानराज प्रकाशन पुणे,१९६४ पान क्रमांक,११०
५) अर्जुने दिलीप,, शोध प्रबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, २००६ पान क्रमांक १२९
६) खडसे बी.के. मांग जात : एक समाजशास्त्रीय अध्ययन, मंगेश प्रकाश नागपूर,१९९० पान क्रमांक १३१
७) ढेरे आर.सी. लज्जागौरी, चौथी आवृत्ती, पद्मगंधा प्रकाशन पुणे,१९७८ पान क्रमांक,१०
८) मुलाखत व प्रश्नावलीच्या आधारे
९) मुलाखत व प्रश्नावलीच्या आधारे